RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक १९] गुरुवार, जुलै १४, २०२२/आषाढ २३, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . | **पृष्ठे** १-३ |

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक १४ जुलै २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2022.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND *PANCHAYAT SAMITIS* ACT, 1961.

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६२ चा महा. ५.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ४३ मधील, पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :— १९६२ चा महा. ५.

"परंतु, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२२ याच्या प्रारंभाच्या दिनांकास पदावर असलेल्या अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांचा पदावधी, राज्य शासनाकडून, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल : २०२२ चा महा. अध्या. ३.

परंतु आणखी असे की, वरील परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा पदावधी, कलम १० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निवडून आलेल्या सदस्यांच्या पदावधीबरोबर समाप्त होईल.".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**३.** (१) जर या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## निवेदन

अध्यक्षाचा व उपाध्यक्षाचा पदावधी, अडीच वर्षांचा असेल अशी तरतूद, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम ४३ मध्ये आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये अशी तरतूद आहे की, उक्त अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, कलम ४३ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, पंचायत समितीचे सभापती व उप सभापती यांच्या पदावधीच्या संबंधात लागू असतील.

**२.** राज्यातील काही जिल्ह्यांमधील जिल्हा परिषदांचे विद्यमान अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि पंचायत समित्यांचे विद्यमान सभापती व उप सभापती यांचा पदावधी लवकरच संपणार आहे. जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या उक्त पीठासीन प्राधिकाऱ्यांच्या पदांच्या निवडणुका, आरक्षण प्रक्रियेची अंमलबजावणी करून, पार पाडण्याची आवश्यकता आहे. राज्यात, आरक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या आणि त्यांच्या प्रशासनाच्या हिताच्या दृष्टीने, राज्य शासनास, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या, पीठासीन प्राधिकाऱ्यांचा उक्त वाढविलेला पदावधी, उक्त अधिनियमाच्या कलम १० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, निवडून आलेल्या सदस्यांच्या पदावधीबरोबर समाप्त होईल या तरतुदीस अधीन राहून, उक्त पीठासीन प्राधिकाऱ्यांचा पदावधी, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल अशी तरतूद तात्काळ करणे आवश्यक वाटत आहे.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ जुलै २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.